Final

# नाना फडणीस

श. श्री. पुराणिक

Final

u प्रकाशक
**छाया प्रकाशन**
३६, न्यू आनंदनगर,
तळेगाव (दाभाडे) – ४१०५०६

u **प्रा. श. श्री. पुराणिक**
फ्लॅट क्र. २, 'लोटस एन्क्लेव्ह',
९८, आनंद पार्क, औंध, पुणे ४११००७.
दूरध्वनी : ०२०–२५८९६१३८

u **अक्षरजुळणी व मुद्रक**
प्रतिमा ऑफसेट
१ बी, देवगिरी इस्टेट, सर्व्हे नं. १७/१ बी,
प्लॉट नं.१४, कोथरूड इंडस्ट्रियल एरिया,
कोथरूड, पुणे – ४११०३८.

u **प्रकाशन दिनांक**
विजयादशमी : ११ ऑक्टोबर २०१६

u किंमत : १२५/–

# *अर्पण पत्रिका*

***कै. वासुदेवशास्त्री खरे***
***यांच्या पुण्यस्मृतीस***

– ✻ –

# प्रस्तावना

## प्रस्तुत चरित्राचे प्रयोजन

१८९२ साली वासुदेव शास्त्री खरे यांनी 'नाना फडनवीसांचे चरित्र' लिहिले. या ११५ वर्षांत खरे शास्त्र्यांच्या चरित्राव्यतिरिक्त मराठी वाङ्मयात नाना फडणिसाचे चरित्र प्रसिद्ध झालेले नाही. या शंभर वर्षांत नाना फडणिसाविषयी बरेच संशोधन झाले असले, तरी त्याचे स्वतंत्र असे चरित्र प्रसिद्ध झालेले नाही. उलट नानाच्या कीर्तीला अपकर्षक असे वाङ्मय मात्र प्रसिद्ध झालेले आहे. या आपल्याच पूर्वजांच्या चारित्र्यहननाच्या स्तुत्य उद्योगात लोकहितवादी गोपाळराव देशमुख यांच्या शतपत्रातला 'नाना फडणिसाचे शहाणपण' असा जो लेख आहे त्याला अग्रमान देणे प्राप्त आहे. नाना फडणिसाच्या शहाणपणाबद्दलचा आपल्या मते फार दिवस रूढ असलेला लोकभ्रम या लेखाद्वारे दूर केला आहे, असा लोकहितवादींचा दावा आहे. या लेखाच्या शेवटी त्यांनी म्हटले आहे की, 'आज जर नाना फडणिस असता तर लोक त्याला वेडा म्हणू लागते व तो पळून गेला असता यांत संशय नाही'. त्यानंतर सत्तर वर्षांनी १९४४ साली बेळगावचे रानडे यांनी 'नारायणरावाचा खून की आत्महत्या' हा ग्रंथ लिहून नाना हा खलपुरुष होता असा सिद्धान्त मांडला. त्यावर तीस पस्तीस वर्षांनी प्रसिद्ध नाटककार विजय तेंडुलकर यांनी नानाकडे आपली नजर आणि लेखणी वळवून 'घाशीराम कोतवाल' या नाटकात नानाच्या वैयक्तिक चारित्र्याला नाजूक ठिकाणी दंश केला. घाशीरामाची सुस्वरूप कन्या ललितागौरी हिच्याशी नानाचा अनैतिक संबंध होता, या कसलाही पुरावा नसलेल्या भाकड कथेवर तेंडुलकरांच्या या नाटकाची उभारणी झालेली आहे. त्याच्या ऐतिहासिक कर्तृत्वाचा विचारसुद्धा करण्याची गरज तेंडुलकरांना वाटलेली नाही. असे हे नाटक

लिहिण्यात त्यांचा उद्देश फक्त नानाच्या जातीच्या चित्पावन ब्राह्मणांचे चारित्र्यहनन करण्याचा होता असा संशय आल्याशिवाय राहात नाही. हे नाटक, नाटकमंडळींनी बर्लिनच्या नाट्यमहोत्सवात सादर करून आपल्या पूर्वजांची कीर्तिध्वजा साता–समुद्रापार फडकवली, या शतकृत्याबद्दल त्यांचे अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे.

## नानाची दुसरी बाजू

पण ईश्वराच्या सृष्टीत जेथे विष आहे तेथेच त्याचा उतारा आहे असे म्हणतात ते काही खोटे नाही. ज्या लोकहितवादींनी नाना फडणिसाचे चारित्र्यहनन केले, त्यांनीच आपल्या 'निबंधसंग्रहा'त स्वतंत्र विस्तृत निबंध लिहून नानाचे चारित्र्यमंडन केले. विष्णुशास्त्र्यांनी आपल्या 'निबंधमाले'त 'लोकहितवादी' असा प्रदीर्घ निबंध लिहून लोकहितवादींच्या नानावरील टीकेला यथायोग्य उत्तर दिले व आपल्या समर्थनार्थ मॅक्डोनल्ड, पामर सारख्या इंगजांचे नानाबद्दलचे गौरवोद्गार दाखल केले. रानडे यांच्या नानाच्या बदनामीला प्रा. न. र. फाटक यांनी बारा व्याख्याने देऊन उत्तर दिले. सेतुमाधवराव पगडींनी 'घाशीराम कोतवाल' हे चार लेख लिहून तेंडुलकरांचा समाचार घेतला. रणांगण ज्याला वर्ज्य होते, त्या नानाच्या भोवती त्याच्या निंदकांची व समर्थकांची झडलेली ही रणधुमाळी पाहून मौज वाटल्याशिवाय राहात नाही. सरदेसायांनी आपल्या 'मराठी रियासत उत्तर विभाग तीन' या ग्रंथात नानाबद्दल केलेल्या प्रतिकूल टीकेला य. न. केळकरांनी केसरीतून उत्तर दिले. केळकरांचे हे लेख 'भूतावर भ्रमण' या त्यांच्या लेखसंग्रहात समाविष्ट केले आहेत.

पण एवढे वाङ्मय निर्माण झाले, तरी नानाचे चरित्र काही नव्याने लिहिले गेले नाही व नाना हा माणूस म्हणून कसा होता याचे विवेचन कोठेच आलेले नाही. ती उणीव दूर करावी, हे माझ्या या नाना फडणिसाच्या चरित्राचे प्रयोजन आहे.

## प्रस्तुत चरित्राचे स्वरूप

नानाचे फक्त गुणवर्णन करून त्याचे चारित्र्यमंडन करणे किंवा त्याचे फक्त दोष वर्णन करून त्याचे चारित्र्यहनन करणे हे या चरित्राचे स्वरूप नाही; तर नानाचे त्याच्या गुणदोषांसह यथावत् चित्र रेखाटणे व एक माणूस म्हणून नाना कसा होता हे यथार्थपणे दाखवणे हे या चरित्राचे उद्दिष्ट आहे. नानाचा सर्वात मोठा गुण म्हणजे आपल्या अलौकिक बुद्धिप्रभावाने त्याने हैदर, निजाम, टिपू इंग्रज या शत्रूंपासून पंचवीस वर्षे मराठी राज्याचे रक्षण केले हा होय. त्याच्या मृत्यूनंतर दोनच वर्षांनी १८०२ साली बाजीरावाशी केलेल्या वसईच्या तहाने इंग्रजांनी मराठी राज्याच्या स्वातंत्र्याचा शेवट केला, या एका गोष्टीवरूनही नानाचे स्थान मराठी राज्याच्या इतिहासात काय होते याची कल्पना करणे कठीण नाही. पण नानाचा सर्वात मोठा दोष म्हणजे वीस वर्षे पेशव्यांच्या नावाने अनिर्बंध सत्ता गाजवण्याची जी सवय त्याला झाली होती तो होय. तिनेच त्याची शोकान्तिका झाली. 'Power corrupts and absolute Power corrupts absolutely'. 'सत्ता माणसाला भ्रष्ट करते व अनिर्बंध सत्ता माणसाला अनिर्बंध भ्रष्ट करते' या वचनाचे उदाहरण नानासारखे दुसरे सापडणे कठीण आहे. नानाच्या या गुणदोषांप्रमाणे, त्याच्या वैयक्तिक जीवनाचे व कौटुंबिक जीवनाचे उपलब्ध झालेले तपशील जमेला धरून नानाचे हे व्यक्तिदर्शन यथाशक्ति पूर्ण करण्याचा मी प्रयत्न केला आहे.

**– श. श्री. पुराणिक**

# ऋणनिर्देश

नानाचे हे चरित्र लिहिताना सरदेसायांच्या मराठी रियासतीचा व वासुदेवशास्त्री खऱ्यांच्या नानाच्या चरित्राचा मी प्रामुख्याने आधार घेतलेला आहे कारण त्याशिवाय या विषयावर संदर्भग्रंथच उपलब्ध नाहीत. खरेशास्त्र्यांनी आपले चरित्र नानाला सांभाळून लिहिले आहे, तर सरदेसायांनी आपले विवेचन नानाला प्रतिकूल ठरेल, असे केले आहे. त्याचाच अनुवाद यदुनाथ सरकारांनी आपल्या 'Fall Of the Moghal Empire' या ग्रंथाच्या चौथ्या खंडात केलेला आहे. १३ मार्च १९०० रोजी नाना फडणिसाची शंभरावी पुण्यतिथी लोकमान्य टिळकांच्या पुढाकाराने उत्साहाने साजरी झाली. त्यावेळी 'केसरी'त द. ब. पारसनीसांचा नानाबद्दलचा प्रदीर्घ लेख प्रसिद्ध झाला. या लेखाचा व वेळास येथे अखंड पन्नासवर्षे झालेल्या नाना फडणिसाच्या उत्सवाचा व त्यांत झालेल्या भाषणांचा संग्रह, पंपवाले के. बी. जोशी यांच्या 'नाना फडणीस – उत्सव पन्नाशी व शकावली' या ग्रंथात केलेला आहे. या ग्रंथाला शं. ना. जोशी यांनी जोडलेली शकावलीही आहे. नाना फडणिसावरच्या संदर्भग्रंथात जोशी यांच्या या ग्रंथाला अग्रपूजेचा मान दिला पाहिजे. या सर्व ग्रंथकारांचा मी अत्यंत ऋणी आहे.

मुखपृष्ठावरील चित्र – छत्रपती शिवाजी महाराज वस्तू संग्रहालय, मुंबई यांच्या सौजन्याने.

(२५ ऑक्टोबर २००७)

**श. श्री. पुराणिक**
२, लोटस् एन्क्लेव्ह,
९८, आनंद पार्क, औंध, पुणे

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | जन्म आणि बालपण | ७ |
| २. | कारकीर्द – थोरला माधवराव (१७६१–१७७२) | १३ |
| ३. | मराठी राज्यास कलंक शनिवारवाडा – पेशव्याचा खून (३०–८–१७७३) | १६ |
| ४. | दादाची शिंदे होळकरांशी भेट | ३० |
| ५. | दादाच्या पक्षाचा निःपात | ४८ |
| ६. | हैदर टिपूवर मोहीम – बदामी काबीज (१७८५–१७७८७) | ५१ |
| ७. | टिपूवर दुसरी मोहीम – मराठे, इंग्रज व निजाम (१७९० जून ते १७९२ फेब्रुवारी) | ५७ |
| ८. | नाना एक माणूस | ६१ |
| ९. | नाना व महादजी | ७८ |
| १०. | खर्डा – दोन व्यक्तींचा संघर्ष | ८५ |
| ११. | सवाई माधवरावाचा मृत्यू (२५ ऑक्टोबर १७९५) | ८९ |
| १२. | सायंकाळ – नानापुढचा बिकट प्रश्न | ९२ |
| १३. | महाडचे कारस्थान | ९८ |
| १४. | नानाचा मृत्यू (१३ मार्च १८००) | १०४ |






– १ –

# जन्म आणि बालपण

बाळाजी जनार्दन उर्फ नाना फडणीस यांचा जन्म १२ फेब्रुवारी १७४२ रोजी सातारा येथे झाला. नाना हे त्यांचे प्रचारातले नाव व भानू हे त्यांचे उपनाम. फडणीशी हा त्यांचा हुद्दा. भट पेशवे हे श्रीवर्धनचे आणि भानू हे वेळासचे. भट आणि भानू हे बरोबरच घाटावर कोकणातून आले आणि पेशवाई भटांची आणि त्याची फडणिशी भानूंची असा हा ऋणानुबंध पेशवाईच्या आरंभापासून अखेरपर्यंत चालत आला.

नानाचा बाप जनार्दनपंत, त्याला बाबा म्हणत. जनार्दनपंताकडे मुक्कामाची पुण्यातली फडणिशी होती व त्याचा भाऊ बाबूराव याच्याकडे स्वारीतली फडणिशी होती. बाबाचा मुलगा नाना आणि बाबूरावाचा मुलगा मोरोबा. दोघांचे पहिल्यापासूनच पटत नसे. पुढे व वयोमानाने हे स्वभावभेद वाढतच गेले. तेव्हा बाबाने व बाबूरावाने दोन्ही मुलांना पृथक् वाटण्या करून दिल्या.

## शरीरबळाची उपेक्षा

मोरोबा हा चांगला धष्टपुष्ट तर नाना म्हणजे शुद्ध पाप्याचे पितर होता. तो काळ मराठी राज्याच्या ऐन उत्कर्षाचा व धामधुमीचा होता. हा धकाधकीचा मामला झेपण्यासाठी त्यावेळी तरवार बहाद्दरी करणाऱ्या क्षत्रियांप्रमाणेच कलमबहाद्दरी करणाऱ्या मुत्सद्यांनाही नेभळी व दुबळी मनगटे बाळगण्याची सोय नव्हती. त्यामुळे बालपणापासूनच आजच्या परिभाषेत 'शारीरिक शिक्षणा'चा 'तास' त्यावेळी सक्तीचा होता. त्यामुळे प्रत्येक मुलाकडून त्या काळात जोर, जोडी, मलखांब, सूर्यनमस्कार हे व्यायाम सक्तीने करवून घेतले जात. या दुथडी भरून वाहणाऱ्या व्यायाम गंगेत नाना कोरडाच्या कोरडा राहिला. शारीरिक तर राहोच, पण पटवर्धन, विंचूरकर वगैरे ब्राह्मण घराण्यातही दिले जाणारे भालाफेक, तरवारबाजी, दांडपट्टा, बोथाटी, घोडदौड वगैरेंसारखे लष्करी शिक्षणही त्याला पारखे झाले. या बाबतीत दोष सर्वस्वी नानाचा होता. त्याला शारीरिक किंवा लष्करी शिक्षण देण्यास किंवा घेण्यास